RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक ४७] बुधवार, एप्रिल ३०, २०२५/वैशाख १०, शके १९४७ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १५६**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ एप्रिल २०२५.

**अधिसूचना**

**आधार ( आर्थिक आणि इतर अनुदाने, लाभ आणि सेवांचे लक्ष्यित वितरण ) अधिनियम, २०१६.**

क्रमांक कौविउ-२०२४/प्र.क्र. १३३/प्रशा-२.— ज्याअर्थी, शासकीय सेवा किंवा लाभ किंवा अनुदाने उपलब्ध करून देताना ओळखपत्र म्हणून आधारचा वापर केल्याने शासकीय प्रक्रिया सुलभ होते, पारदर्शकता आणि परिणामकारकता येते, लाभार्थ्यांना त्यांचे लाभ सुविधाजनकरित्या प्रत्यक्षपणे मिळणे सुलभ होते, आणि आधारमुळे ओळख सिद्ध करण्यासाठी एकापेक्षा जास्त दस्तावेज सादर करण्याची गरज दूर होते;

आणि ज्याअर्थी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग ( यापुढे ज्याचा "विभाग" असा उल्लेख करण्यात येत आहे) १८ ते ३५ वर्षे वयोगटातील नोकरी शोधणाऱ्या उमेदवारांची रोजगारक्षमता वाढविण्यासाठी अकरा महिन्यांकरिता प्रशिक्षणासह विद्यावेतन देणारी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना ( यापुढे जिचा "योजना" असा उल्लेख करण्यात येत आहे) राबवित आहे, जिची अंमलबजावणी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, नवी मुंबई ( यापुढे जिचा "अंमलबजावणी यंत्रणा" असा उल्लेख करण्यात येत आहे) यांच्याकडून होत आहे;

आणि ज्याअर्थी, योजनेंतर्गत अंमलबजावणी यंत्रणेकडून १८ ते ३५ वर्षे वयोगटातील उमेदवारांना ( यापुढे ज्याचा "लाभार्थी" असा उल्लेख करण्यात येत आहे) सोबतच्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आर्थिक सहाय्य ( यापुढे ज्याचा "लाभ" असा उल्लेख करण्यात येत आहे) देण्यात येते;

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | प्रतिमाह विद्यावेतन रुपये |
|---|---|---|
| १. | १२ वी पास | ६,०००/- |
| २. | आय.टी.आय/ पदविका | ८,०००/- |
| ३. | पदवीधर /पदव्युत्तर | १०,०००/- |

आणि ज्याअर्थी, योजनेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या एकत्रित निधीमधून आवर्ती खर्च करणे समाविष्ट आहे.

त्यामुळे आता, आधार (आर्थिक आणि इतर अनुदाने, लाभ आणि सेवांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ (२०१६ चा १८) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) च्या कलम ७ नुसार महाराष्ट्र शासन पुढीलप्रमाणे अधिसूचित करीत आहेः-

१. (१) योजने अंतर्गत लाभ घेण्यास पात्र असलेली व्यक्ती आधार क्रमांक बाळगत असल्याचा पुरावा सादर करेल किंवा आधार अधिप्रमाणन करेल.

(२) योजने अंतर्गत लाभ मिळवण्यासाठी इच्छुक असलेली कोणतीही व्यक्ती, जिच्याकडे आधार क्रमांक नाही किंवा जिने अद्यापी आधार नोंदणीसाठी अर्ज केलेला नाही. तिने योजनेसाठी नोंदणी करण्यापूर्वी आधार नोंदणीकरिता अर्ज करणे आवश्यक असेल, परंतु असे की, ती उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये आधार मिळविण्यास हक्कदार असणे आवश्यक असेल. आणि अशा सर्व व्यक्ती, आधार नोंदणीसाठी अर्ज करण्याकरता नजीकच्या कोणत्याही आधार केंद्रास (UIDAI च्या *www.uidai.gov.in* या संकेतस्थळावर यादी उपलब्ध) भेट देतील.

(३) आधार (नोंदणी आणि अद्ययावत) विनियम, २०१६ च्या नियम १२ नुसार, अद्याप आधार नोंदणी न केलेल्या लाभार्थींसाठी संबंधित ब्लॉक किंवा तालुका किंवा तहसीलमध्ये आधार नोंदणी केंद्र उपलब्ध नसल्यास विभागाने अंमलबजावणी यंत्रणेच्या माध्यमातून किंवा UIDAI च्या विद्यमान निबंधकांच्या समन्वयाने किंवा स्वतःचं UIDAI रजिस्ट्रार बनून सोयीच्या ठिकाणी नावनोंदणी सुविधा प्रदान करणे आवश्यक आहेः

परंतु व्यक्तीला आधार मिळेपर्यंत खालील ओळखपत्रे सादर करण्याच्या अधीन राहून अशा व्यक्तींना योजनेचा लाभ देण्यात येईलः-

(अ) जर उमेदवाराने नावनोंदणी केली असेल, तर त्यांची आधार नोंदणी आयडी स्लिप; आणि

(ब) पुढीलपैकी कोणतेही एक कागदपत्र-

(i) छायाचित्र असलेले बँक किंवा पोस्ट पासबुक; किंवा

(ii) कायम खाते क्रमांक (पॅन) कार्ड; किंवा

(iii) पारपत्र; किंवा

(iv) शिधापत्रिका; किंवा

(v) मतदार ओळखपत्र; किंवा

(vi) मनरेगा कार्ड; किंवा

(vii) किसान फोटो पासबुक; किंवा

(viii) मोटार वाहन कायदा, १९८८ (१९८८ चा ५९) अंतर्गत परवाना प्राधिकरणाने निर्गमित केलेला वाहनचालन परवाना; किंवा

(ix) राजपत्रित अधिकारी किंवा तहसीलदार यांनी निर्गमित केलेले छायाचित्र असलेले अधिकृत लेटर हेडवरील ओळख प्रमाणपत्र;

किंवा

(x) विभागाने विहित केलेले इतर कोणतेही दस्तऐवजः

परंतु पुढे असे की, वरील कागदपत्रे त्या प्रयोजनासाठी राज्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याद्वारे तपासली जाऊ शकतात.

२. योजनेंतर्गत, लाभार्थ्यांना सहजरित्या लाभ मिळावा यासाठी उक्त आवश्यक बाबींबाबत लाभार्थीना माहिती करून देण्याकरिता प्रसिद्धी माध्यमांमधून व्यापक प्रसिद्धी करण्यात येईल याची विभाग आपल्या अंमलबजावणी यंत्रणेच्या माध्यमातून व्यवस्था करेल.

३. लाभार्थ्यांच्या खराब बायोमेट्रिक्समुळे किंवा कोणत्याही कारणामुळे आधार प्रमाणीकरण अयशस्वी झाल्यास, अशा सर्व प्रकरणांमध्ये, खालील उपाययोजना अवलंबण्यात येतीलः-

(अ) बोटांच्या ठशांची गुणवत्ता खराब असल्यास, सुविधाजनक लाभ प्रदानाकरिता, प्रमाणीकरणासाठी एकत्रित जोखीम माहिती प्रणाली (IRIS) स्कॅन किंवा चेहरा अधिप्रमाणन सुविधा अवलंबण्यात येईल, त्याद्वारे विभाग त्याच्या अंमलबजावणी यंत्रणेच्या माध्यमातून IRIS स्कॅनर किंवा चेहरा अधिप्रमाणनासहीत बोटांच्या ठश्यांद्वारे अधिप्रमाणनाची व्यवस्था करेल;

(ब) बोटांचे ठसे किंवा IRIS स्कॅन किंवा चेहरा अधिप्रमाणनच्या माध्यमातून बायोमेट्रिक अधिप्रमाणन यशस्वी न झाल्यास, शक्य आणि अनुज्ञेय असेल तेथे प्रकरणपरत्वे, वन टाईम पासवर्ड किंवा मर्यादित वेळ वैधता असलेले कालावधी-आधारित वन टाईम पासवर्डद्वारे अधिप्रमाणन उपलब्ध करून देण्यात येईल;

(क) बायोमेट्रिक किंवा आधार वन-टाईम पासवर्ड किंवा कालावधी-आधारित वन-टाईम पासवर्ड इ.च्या माध्यमातून प्रमाणीकरण शक्य नाही, अशा इतर सर्व प्रकरणांमध्ये आधार पत्रावर छापण्यात आलेल्या क्यूआर कोडच्या आधारे ज्यांची अधिकृतता तपासली जाऊ शकते अशा भौतिक आधार पत्रांच्या आधारे योजने अंतर्गत लाभ दिले जाऊ शकतात आणि विभाग, अंमलबजावणी यंत्रणेच्या माध्यमातून सोयीच्या ठिकाणी क्यूआर कोड रीडरची व्यवस्था करेल.

४. उपरोक्त मुद्यांव्यतिरीक्त, कोणताही वास्तविक लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये याकरिता, विभाग अंमलबजावणी यंत्रणेच्या माध्यमातून डीबीटी मिशन, कॅबिनेट सचिव, भारत सरकार यांचे कार्यालयीन आदेश दि.१९ डिसेंबर २०१७ मध्ये आखून दिलेल्या अपवाद हाताळणी प्रणालीचे अनुसरण करेल.

५. ही अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत **राजपत्रात** प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

**श्रीनिवास शास्त्री,**
शासनाचे सह सचिव.